Gram : "Dnyanteerth"
Swami Ramanand Teerth
Marathwada University
"Dnyanteerth", Vishnupuri,
Nanded – 431 606 (M.S.)

तार : ''ज्ञानतीर्थ''
स्वामी रामानंद तीर्थ''
मराठवाडा विद्यापीठ,
''ज्ञानतीर्थ'', विष्णुपूरी,
नांदेड-४३१ ६०६ (महाराष्ट्र)

संदर्भ : परीक्षा/कला पदव्युत्तर/२०११-१२/2276

दिनांक : १२-०९-२०११
14.9.11

प्रति,
मा. प्राचार्य,
सर्व संलग्नीत कला पदव्युत्तर महाविद्यालये
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय : हिवाळी-२०११ च्या परीक्षेकरीता जुन्या सत्र पध्दती अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्र स्विकारणेबाबत.

महोदय,

जुन्या सत्र पध्दती अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना परीक्षा देण्याची शेवटची संधी उन्हाळी-२०११ मध्ये संपलेली आहे. यानंतर जे विद्यार्थी जुन्या सत्र पध्दती अभ्यासक्रमामध्ये अनुत्तीर्ण राहतील अशा विद्यार्थ्यासांठी परीपत्रक क्र. शैक्षणिक/०१/अभ्यासक्रम संधी/२०१०-२०११/२८०५ दिनांक ०७/१२/२०१० काढण्यात आलेले होते.

तथापी या संदर्भात काही विद्यार्थी संघटना/विद्यार्थी यांनी विनंती केल्यानुसार जुन्या सत्र पध्दती अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना त्यांचा जुना परफार्मन्स रद्द न करता परीक्षा देण्यासाठी हिवाळी-२०११ ही आणखी एक संधी पुढील प्रमाणे उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्यानंतर <u>मात्र आणखी संधी वाढवुन मिळणार नाही व उपरोक्त प्रमाणे परीपत्रकानुसारच पुढील परीक्षेकरीता कार्यवाही केली जाईल. याची संबंधितांनी नोंद घ्यावी.</u>

१) जुन्या सत्र पध्दती अभ्यासक्रमानुसार प्रथम वर्षात जे विद्यार्थी ऐटीकेटी प्राप्त आहेत अशा विद्यार्थ्यांनी अनुत्तीर्ण राहीलेल्या पेपर क्रमांकाचीच परीक्षा नवीन सत्र पध्दती अभ्यासक्रमातील त्याच पेपर क्रमांकानुसार द्यावी. ( उदा जुन्या सत्र पध्दती अभ्यासक्रमात मराठी विषयाचा पेपर क्र. २ अनुत्तीर्ण असेल तर नवीन सत्र पध्दती अभ्यासक्रमातील मराठी विषयाचा पेपर क्रमांक २ नुसारच परीक्षा द्यावी. )

२) जुन्या सत्र पध्दती अभ्यासक्रमानुसार द्वितीय वर्षात जे विद्यार्थी अनुत्तीर्ण झालेले आहेत अशा विद्यार्थ्यांनी देखील जुन्या सत्र पध्दती अभ्यासक्रमात अनुत्तीर्ण राहीलेल्या पेपर क्रमांकाचीच परीक्षा नवीन सत्र पध्दती अभ्यासक्रमातील त्याच पेपर क्रमांकानुसार द्यावी लागेल.

३) प्रथम वर्ष किंवा द्वितीय वर्षामध्ये जे विद्यार्थी जुन्या सत्र पध्दती अभ्यासक्रमानुसार सर्व लेखी परीक्षेत अनुत्तीर्ण किंवा अनुपस्थित असतील अशा विद्यार्थ्यांनी मात्र नवीन सत्र पध्दती अभ्यासक्रमानुसारच लेखी व अंतर्गत परीक्षेकरीता परीक्षा आवेदनपत्रे सादर करावीत.

वरील प्रमाणे झालेल्या बदलाची माहिती सर्व संबंधित विद्यार्थ्यांना देण्यात यावी, ही विनंती.

परीक्षा नियंत्रक